महाराष्ट्र शासन
**सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद**
पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद – ४३१ ००५
दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९
इमेल: roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

जा.क्र. : विकाऔ/शिक्षण/२०२२/270 दिनांक : 28 JAN 2022

**महत्वाचे/कालमर्यादित**

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासन अनुदानीत, विनाअनुदानीत
औषधनिर्माण पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था
औरंगाबाद विभाग.

विषय:- सतरा नंबर फॉर्मवर १२ वी उत्तीर्ण होऊन व १० वी च्या शाळा सोडल्याच्या दाखल्याची द्वितीय प्रत (Duplicate TC) वर शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये औषधनिर्माण पदविका (Diploma Pharmacy) मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती सादर करणे बाबत.

उपरोक्त विषयी या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व औषधनिर्माण पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांना सुचित करण्यात येते की, सतरा नंबर फॉर्मवर १२ वी उत्तीर्ण होऊन व १० वी च्या शाळा सोडल्याच्या दाखल्याची द्वितीय प्रत (Duplicate TC) वर शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये औषधनिर्माण पदविका (Diploma Pharmacy) मध्ये आपल्या संस्थेमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची खालील सर्व कागदपत्रे प्राचार्यांनी साक्षांकित करुन या कार्यालयामध्ये खालील वेळापत्रकांनुसार हजर रहावे. त्याच बरोबर सोबत शैक्षणिक वर्ष २०२१-२२ ची प्रवेशित विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी आणावी.

१) १० वी ची Duplicate TC घेतांना त्याच्या शाळेत दिलेली Police Station मधील तक्रार,
२) त्यासंबधी वर्तमान पत्रातील जाहिरात,
३) विद्यार्थ्याने सादर केलेल्या शपथपत्र

| अ.क्र. | जिल्हा | उपस्थित राहण्याचा दिनांक |
|---|---|---|
| १. | औरंगाबाद, जालना, बीड व परभणी | ३१.०१.२०२२ |
| २. | नांदेड, हिंगोली, लातुर व उस्मानाबाद | ०१.०२.२०२२ |

जिल्हानिहाय संस्थांनी त्रुटयांच्या पुर्ततेसाठी वरील वेळापत्रकांनुसार या कार्यालयात हजर राहणे आवश्यक आहे. वेळेवर वर नमुद सर्व आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित नसणाऱ्या संस्थांची नंतर दखल घेतल्या जाणार नाही. त्यामुळे अश्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश निश्चितीवर होणाऱ्या परीणामास संस्था प्रमुख सर्वस्वी जबाबदार राहतील याची गंभीर नोंद घ्यावी.

**(उमेश नागदेवे)**
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद.